Vol. 6 | Special Issue 1 | March 2019
ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640
Special Issue

# SCHOLARS IMPACT

Quarterly

International Multidisciplinary Multilingual Journal of Contemporary Research

UGC Approved Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98



Special Issue on

# MAHATMA GANDHI IN THE CHANGING TIMES

(Book 2)

EDITOR IN CHIEF
DR. M. RAGHIB DESHMUKH

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Issue Editors
Dr. Ramkishan Bhise
Dr. Digambar Rode
Mr. Hanuman Wankar

MAHATMA GANDHI

Degloor College Degloor
Dist. Nanded

VOL. 6| SPECIAL ISSUE 6 | MARCH 2019

Impact Factor: 5.98

UGC APPROVED JOURNAL NO. 41129 [P-ISSN: 2394-7632] [E-ISSN: 2394-7640]

# SCHOLARS IMPACT

## International Multidisciplinary Multilingual Journal of Contemporary Research

AN INTERNATIONALLY INDEXED, PEER REVIEWED, QUARTERLY, PRINT & ONLINE JOURNAL

## *SPECIAL ISSUE*

## ON

# MAHATMA GANDHI
# IN THE CHANGING TIMES

**(BOOK 2)**

*Editor-in - Chief*
**Dr. M. Raghib Deshmukh**

*Issue Editors*
**Dr. Ramkishan Bhise**
**Dr. Digambar Rode**
**Mr. Hanuman Wankar**

*Managing Editor*
**Dr. M. Aaqib Deshmukh**

**Published By:**
**DESHMUKH PUBLICATIONS, PVT. LTD.**
"Soyba Villa" Beside "Deshmukh Hospital" Millat Colony, At. Khamgaon Dist. Buldana
(Maharashtra) India -444303 Cell No- +91-9422926544
Email:- scholarsimpact@yahoo.com, Web: www.scholarsimpact.com
**Printed at Snehal Printers and Book Binders, Parbhani -431401 Mob. +91 8329000732 nmpublication@gmail.com**

ADAT VYAPARI ... SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR * Dist.Nanded *



## Contents


| | | |
|---|---|---|
| 1. महात्मा गांधी यांचा मूल्यनिष्ठ जनसंवाद | डॉ. राजेंद्र गोणारकर | 6 |
| 2. महात्मा गांधी आणि भारताचा ग्रामीण विकास : एक अभ्यास | आचार्य व्हि.डी. | 8 |
| 3. महात्मा गांधी आणि सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार | डॉ. गणेश मोहिते | 11 |
| 4. महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार | डॉ. एस. एन. आकुलवार | 13 |
| 5. सध्यकालीन प्रश्नांना गांधीवादी विचारांचा पर्याय | डॉ.माधव चोले | 15 |
| 6. खादी ग्रामोद्योग - एक विचार | भाग्यश्री दाणे | 18 |
| 7. महात्मा गांधी आणि भारताचे विभाजन यावर वादविवाद | धप्पाधुळे रामेश्वर शं. | 20 |
| 8. महात्मा गांधीच्या धार्मिक आणि राजकिय विचारांचे संक्षिप्त अवलोकन | डॉ. ढोले चंद्रशेखर शं. | 22 |
| 9. महात्मा गांधी यांच्या विचारांचा मराठी साहित्यावर प्रभाव | डॉ. डिगोळे बालाजी वि. | 24 |
| 10. भारतीय खेडी या संदर्भात महात्मा गांधीचा वैचारिक दृष्टीकोन | डॉ.भगवान डोंगरे | 28 |
| 11. गांधी प्रणित शिक्षण प्रणाली : एक दृष्टिक्षेप | कु.फुलारी ज्योती महिशंकर | 31 |
| 12. ग्रामीण विकासातील महात्मा गांधीचे योगदान | गाडवे मनिषा महारूद्र | 33 |
| 13. महात्मा गांधी यांचे भारतीय लोकशाहीतील योगदान | डॉ.एल.डी.गलंडे | 35 |
| 14. महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकासातील महत्त्वपूर्ण योगदान | डॉ. यादव घोडके | 37 |
| 15. महात्मा गांधीजीचे सत्याग्रह विषयक विचार | लक्ष्मण मा. घोटेकर | 40 |
| 16. पांढरे ढग आणि उल्का या कादंबऱ्यावर गांधीवादाचा प्रभाव | डॉ.आशा सोपानराव गिरी | 42 |
| 17. महात्मा गांधीजींची साध्य साधन सुचिता | डॉ. सखाराम य. गेरे | 44 |
| 18. महात्मा गांधी: सत्याग्रह एक प्रभावी साधन प्रा.विक्रम ल.खेडकर | डॉ.अनिल पां.हजारे | 46 |
| 19. ग्रामीण विकासाचे शिल्पकार महात्मा गांधी | डॉ. इरलापल्ले पल्लवी भा. | 49 |
| 20. ग्रामीण विकासाबाबत महात्मा गांधींचा दृष्टीकोन | सौ.प्रियंका वि. जाधव (आवते) | 51 |
| 21. गांधीवादातील निवडक पैलूचे अध्ययन | सुरेश लोभाजी जाधव | 53 |
| 22. जागतिकीकरण, महात्मा गांधी आणि काही प्रश्न | डॉ. मारोती तेगमपुरे | 56 |
| 23. महात्मा गांधींचे भाषाविषयक कार्य | डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्रे | 59 |
| 24. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | डॉ. संतोष तुकाराम कदम | 61 |
| 25. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था आणि महात्मा गांधी यांचे विचार | रमेश तारकराम खंडागळे | 65 |
| 26. इंग्रज आणि भारतीय भाशेतील साहित्यावर महात्मा गांधीजींचा प्रभाव | प्रा. कोटरंगे दत्ता नामदेव | 68 |
| 27. ग्रामीण विकासासाठी महात्मा गांधीजीचा —दृष्टीकोन | डॉ.लोखंडे बी.बी. | 70 |
| 28. मराठी कवितेवर गांधीवादाचा प्रभाव | डॉ. अशोक गौरीशंकर माळगे | 72 |
| 29. गांधीजींचे उद्योग आणि व्यापार विषयक विचार | डॉ. माळी चंद्रकांत बन्सी | 74 |
| 30. महिला सक्षमीकरणातील गांधीजींची भूमिका | डॉ. पी. व्ही. माने | 77 |
| 31. महात्मा गांधीजींचे महिला सशक्तीकरण बद्दलचे विचार | डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे | 79 |

| | | |
|---|---|---|
| 32. महात्मा गांधी यांनी मांडलेला महीलोन्नतीचा विचार | अनुप अरुण नांदगावकर | 82 |
| 33. म. गांधीजीचे लोकशाहीभिमूख ग्रामस्वराज्य | डॉ. बी.ए. निर्मख | 85 |
| 34. महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार व आजचा ग्रामीण भारत | पाटील सुभाष लक्ष्मण | 87 |
| 35. महात्मा गांधी व सत्याग्रह सिध्दांत | डॉ. पाटील विनायक उध्दवराव | 90 |
| 36. लोकशाही आणि सु—शासन | डॉ.मीरा विठ्ठलराच फड | 93 |
| 37. गांधीजींच्या शैक्षणिक प्रयोगाची विशेषत: एक दृष्टिक्षेप | डॉ. कालिदास दिनकर फड<br>डॉ. सतोष काकडे | 96 |
| 38. महात्मा गांधीच्या विचारातील खेडे : एक अभ्यास | डॉ. टि. डी. राजगुरे | 98 |
| 39. महात्मा गांधीजींचे स्त्रीमुक्ती विषयक विचार | रकटे ज्योती भाऊसाहेब | 101 |
| 40. महात्मा गांधीचे आर्थिक विचार | डॉ. सुरेश सामाले | 103 |
| 41. महात्मा गांधीजींचा ग्रामीण विकासाचा दृष्टिकोन | डॉ. भगवान सांगळे | 106 |
| 42. म. गांधी आणि भारतीय स्वातंत्र्य संग्राम : एक अध्ययन | डॉ. शिंदे आर.डी. | 110 |
| 43. महात्मा गांधी यांचे सर्वोदय, खादी ग्रामोद्योग व स्वदेशी संबंधी विचार | डॉ. टि.जी. सिराळ | 114 |
| 44. राष्ट्रसंत तुकडोजींच्या साहित्यातील 'गांधीविचार' | डॉ. अनंत सूर्यभान सूर्यकार | 117 |
| 45. महात्मा गांधी यांच्या विचारांचे ग्रामीण विकासातील योगदान | तोंडारे विजय नागनाथ | 121 |
| 46. महात्मा गांधीचे स्त्री विषयक विचार | डॉ.अलका प्रदीप वालचाळे (सरोदे) | 123 |
| 47. गांधीजीच्या ग्रामीण विकासाचे विचार वर्तमान परिस्थितीत उपयोगी | ए. एम. वानखडे | 125 |
| 48. महात्मा गांधीचा 'स्त्री' विषयक दृष्टिकोन : चिकित्सक विश्लेषण | शितल रुद्रमुनी येरुळे | 127 |
| 49. म.गांधीजींचा ग्रामीण विकासाचा दृष्टीकोन | डॉ.आहिरे भास्कर मुरलीधर | 130 |
| 50. महात्मा गांधीचा ग्रामीण विकासाबद्दलचा दृष्टीकोण | डॉ. चव्हाण बी.एम. | 132 |
| 51. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास | अर्चना कुंडलिकराव चवरे | 134 |
| 52. गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता | डॉ. आर.के. काळे | 136 |
| 53. आजचे भारतीय राजकारण व गांधी विचारांची प्रासंगिकता | डॉ. राठोड डी.बी. | 138 |
| 54. महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचार | कल्याण दत्तात्रय यादव | 140 |
| 55. उपोषण अस्त्र : गांधींना आहार व आरोग्य व्यवस्थापनाचा आधार | उमेश रामचंद्र साडेगावकर | 142 |


ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

DEGLOOR COLLEGE DEGLOOR
SADAT VYAPARI ... SOCIETY'S
* Dist.Nanded *

5.

# सध्यकालीन प्रश्नांना : गांधीवादी विचारांचा पर्याय

**प्रा.डॉ.माधव चोले**
राज्यशास्त्र विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड. 431717
Mob : 9970563385,

महात्मा गांधी हे विचार आणि आचारात सुसंगतपणा असणारे व्यक्तिमत्व होते. गांधींनी सांस्कृतिक विभिन्नता असणाऱ्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देवून नवभारताची राष्ट्रबांधणी करण्याचे मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आणि यशस्वीही झाले. गांधीना आपल्या नवभारतात व्यक्तीचा सर्वांगीण विकास करावयाचा असल्यास व्यक्तींना विवेकबुध्दीची स्वायत्तता असणारा शासनमुक्त समाज, व्यक्ती-व्यक्तीत भेदविरहीत सामाजिक, आर्थिक समन्वय, सलोखा असणारा समाज, श्रमाला महत्व असणारा आणि भौतिक चैनविलासापासून दूर असणारा समाज साध्य करणे हे गांधीजींचे साध्य तत्व होते. त्यासाठी गांधीनी सत्याग्रह, अहिंसात्मक मार्ग, विश्वस्तता, सर्वोदय याचा साधन म्हणून वापर करावा असे गांधींनी सांगितले आणि स्वतः व्यवहारातही आणले. गांधी साध्य-साधन तत्वाला महत्व देतात ते म्हणतात, भ्रष्ट साधनाची परिणीती भ्रष्ट साध्यात होते. साधने विशुध्द असतील तर साध्याकडे अधिक वेगाने वाटचाल होईल. याचाच अर्थ उत्तम साध्या बरोबर साधने ही विशुध्द असावी लागतात.

गांधी विचारांची प्रस्तुतता पाहण्यासाठी सध्याकालीन प्रश्नांची चर्चा होणे आवश्यक आहे. औद्योगिकीकरणांमुळे, शहरीकरणांमुळे पर्यावरण धोक्यात येवून त्याचा परिणाम निसर्ग आणि मानवी आरोग्यावर होत आहे. त्यासाठी पर्यावरणपुरक, संवर्धनासाठी गांधी विचारांची आवश्यकता आहे. दुसरा मुद्दा म्हणजे मानव अधिकाधिक सत्ता, संपत्ती, भौतिक भोगविलासी झाल्यामुळे तसेच मनुष्याची वरचेवर विवेकशील कमी होत आहे. जात, धर्माची चिकित्साही दुरावली आहे. प्रतिनिधिक लोकशाहीत आलेल्या राजकीय भाणाला पक्के अधिष्ठाण नसल्याने मानव हा अधिकाधिक जात, जमातवादी होत आहे. त्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर दंगली, हिंसा वाढत चाललेल्या आहेत. त्यामुळे आज गांधींच्या शांततावादी अहिंसेची आवश्यकता आहे. तिसरा मुद्दा म्हणजे राज्यकर्ता वर्ग लोक सम्मुख व गरिब सम्मुख झाला पाहिजे होता. पण तसे न होता राज्यकर्ता वर्ग, उत्पादन केंद्रीत, सत्ताकेंद्रीत, भांडवलशाहीच्या हातातील बाहुले बनले आहे. त्यासाठी मानवकेंद्रीत सत्तेसाठी राजकीय विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे राज्य संस्थेच्या अन्यायकारी धोरणाविरुध्द पूर्ण सत्याग्रही मार्गाने विरोध करण्याची गरज आहे. शिवाय हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी, सर्वधर्म समभावासाठी, स्त्रीयांचा राजकारणात सहभाग वाढविण्यासाठी गांधी विचारांची आज नितांत गरज आहे. गांधी विचारांने हे प्रश्न कसे हाताळता येतील ते पाहू.

**उत्पादन पध्दत-छोट्या प्रमाणाचा प्रश्न-भांडवलशाहीची समीक्षा-पर्यायी आर्थिक निती :-** गांधीने भांडवलशाही केंद्रीत अर्थव्यवस्थेला विरोध करुन (समीक्षा) खेड्यांची स्वंयपूर्णता, स्वायत्तता व स्वावलंबनावर भर दिला त्यात शेती लहान प्रमाणात करण्यावर व त्याला पुरक म्हणून ग्रामोद्योगावर भर दिला. आज या विचारांची निकड आहे.

सध्या भांडवली धार्जिणी, सत्ता, संपत्ती, शहरीकेंद्रीत धोरण, प्रतिष्ठाण निर्माण झालेली आहेत. उदा : स्मार्ट इंडिया, डिजिटल इंडिया या धोरणांमुळे शहरे चकमकीत होतात. लोकांना शहरांचे आकर्षण वाढले आहे. शहरांकडे लोकांचा ओघ वाढला आहे. पण या शहरीकरणामुळे वाढत्या औद्योगिकीकरणामुळे मानव खऱ्या गरजा, खरे सुख, समाधान, शांती, यापासून दुरावला आहे. सर्वजण नुसते भांडवली, सत्ता, संपत्ती, भोगाविलासी स्पर्धेत धावत आहेत. एकमेकांबद्दल प्रेम, दया राहिलेली नाही. प्रत्येकांच्या ध्येयामागे, कृतिमागे अर्थ-राजकारणच दिसून येते. मात्र याचा अर्थ असा नाही की, सरकारांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेबद्दल धोरणे घेतलीच नाहीत. घेतली पण जेवढी गुंतवणुक करायला पाहिजे जी प्रतिष्ठा, ग्रामीण अर्थव्यवस्थेला द्यायला पाहिजे ती मिळाली नाही. त्यामुळे शहरे चकमकीत खेडी ओस पडल्यासारखी झालेली आहेत. खेडी आणि संबंधीत अर्थव्यवस्थेला केंद्रभुत मानून शासनाने धोरणे आणि प्रतिष्ठा मिळवून दिली तर खऱ्या अर्थाने अनेक प्रश्न मिटणार आहेत. पण सरकारचा उद्देश खेड्यात जास्त गुंतवणुक केली तर तिजोरीत भर पडणार नाही, परकीय भांडवल आणि उद्योगांमुळे तिजोरीत भर पडते, अनेकांना रोजगार मिळतो हे खरे असले तरी भांडवलधार्जिनी व्यवस्था अनेक पेच निर्माण करते आणि त्यावर सरकारला बराच खर्च करावा लागतो. भांडवली अर्थव्यवस्था मानवात जीवघेणी स्पर्धा निर्माण करते, शहरात परस्पर मत्सर, द्वेष, हिंसा, भांडणे, तंटे निर्माण होतात. त्यातुन आत्महत्या, बलात्कार, खुन, दंगली, रक्तपात निर्माण होतो आणि हे प्रमाण वाढतच चालले आहे. मुख्यतः या अर्थव्यवस्थेमुळे समाजातील रचनेत आर्थिक विषमतेची दरी भयावह स्वरुपात वाढत आहे. व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व आणि स्वायत्तता नष्ट होत आहे. शहरीकरण हे अनेक समस्यांचे नेटवर्क बनले आहे. पर्यावरणाचा जिवघेणा प्रश्न निर्माण झालेला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मोडकळीस आलेली आहे.

याचा अर्थ गांधीजींचा यात्रीकरण आणि भांडवलशाहीला विरोध होता असे नाही तर गांधींनी अनेक भयावह प्रश्न निर्माण होणार आहे. म्हणून विज्ञान आणि तंत्रज्ञान मानवतेला पुरक असावे. भांडवलशाहीचा अतिरेकी स्वरुपाऐवजी, छोटे प्रमाण त्यांना मान्य होते. त्यामुळे गांधी पर्यायी आर्थिक नीती सांगतांना शेती व ग्रामोद्योगांना प्राधान्य देवून जास्तीत जास्त गुंतवणुक, शेती व संबंधीत उद्योगांवर करावा, मोठ्या उद्योगाऐवजी शेतीशी पुरक छोट्या उद्योगधंद्यावर भर

ADAT VYAPARI ... SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

द्यावा, शेतकऱ्यांनी आपल्या शेती हा मुख्य व्यवसाय करण्या बरोबरच पुरक व्यवसायही करावेत, त्यामुळे अनेक प्रश्न मिटण्यास मदत होईल. जीवघेणी स्पर्धा असणार नाही. तसेच मोठ-मोठी धरणे न बांधता, छोटी-छोटी धरणे, बंधारे बांधावीत जेणे करुन शेती व्यवसायाला पाण्याचा साठा मुबलक होईल. पण याचा अर्थ सरकार प्रयत्न करीत नाही असा नाही. करते पण फारच तोकडा आहे. शिवाय उद्योग शहरातच स्थापन करण्याऐवजी त्याचे विकेंद्रीकरण करावे. जेथे जो कच्चा माल आहे तेथे उद्योग स्थापन करावीत. असे झाले तर मानव केंद्रीत व्यवस्था, पर्यावरण पुरक व्यवस्था निर्माण होईल.

**सत्यागृही मार्गाने राज्यसंस्थेला विरोध :-** गांधीने परकीय राजवटीच्या काळात जूलुम आणि अन्यायाविरुध्द लढण्याचे, अहिंसात्मक साधन म्हणून सत्यागृहांचा वापर केला. सत्यागृहाचा अर्थ असा की "सत्याची प्रस्थापना करण्यासाठी व्यक्तीने, समुहाने केलेली अहिंसात्मक कृती होय". या अर्थाच्या अंशाला धक्का न लावता सध्या उपलब्ध अर्थराजकीय चौकटीतील व्यवहारिक राजकारण कसे घडवता येईल. या प्रश्नांचा विचार सत्यागृही राजकारणांची प्रस्तुत शोधतांना करावा लागेल. अंहिसात्मक मार्गानेच सत्यागृही कृती केली पाहिजे या मार्गानेच आपण अंतिम सत्यापर्यंत जावून पोहोचतो. गांधीच्या मतानूसार सत्यागृही व्यक्तींच्या अंगी आत्मसंयमन, ब्रम्हचर्य, शाकाहार, कृत्रिम बनावट सभ्यतेपासून दोन हात दूर, अपरिहार्य जोपासणे, कर्मयोग आचरणे इत्यादी गुण असावे लागतात. सत्यागृहाचा वापर, वैयक्तिक तसेच सामुहिक पातळीवर करता येते. आणि तसा करावा पण सत्यागृह हा सामाजिक हितासाठीच, करावा. वैयक्तिक लाभासाठी करु नये, अन्याय करण्यासाठी करु नये, संपूर्ण अहिंसेचाच मार्ग अनुसरला पाहिजे. सर्वांनी सामुहिक शीस्तही पाळली पाहिजे. गांधींनी सत्यागृही मार्गात, आत्मशुध्दी, असहकार करणे, सविनय कायदेभंग करणे, हरताळ, बहिष्कार, हिजरत, उपोषण, इत्यादींचा वापर करावा असे सांगितले.

आपण भांडवलशाही समाजाच्या प्रस्थापित अर्थराजकीय चौकटीत सत्यागृहांचे राजकारण घडवू पाहत आहोत या सामाजिक व्यवस्थेत आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, संपत्ती व संधीच्या विषम विभाजनातून निरनिराळे हितसंबंधी गट आकाराला येत असतात. भांडवली समाज विषमतेवर आधारलेला असल्याने समाजातील प्रभुत्वशाली हितसंबंधी गट इतरांचे शोषण करीत असतात. या शोषणातून इतर तळाच्या वर्गातील माणसांचे भौतिक जीवन, अस्तित्व धोक्यात येते या प्रक्रियेत राज्यसंस्था तटस्थ न राहता विशिष्ट हितसंबंधी गटांच्या बाजूने सतत हस्तक्षेप करत असते. तिला लाभलेल्या दंडशक्तीच्या आधारे राज्यसंस्था समाजाचा केंद्रस्थानी असते.

अशा व्यवस्थेत सत्यागृही व्यक्तीने समुहाने भांडवलशाही चौकटीत राज्यसंस्थेची भुमिका ओळखून शोषितांच्या बाजूने हस्तक्षेप करावा हे करत असतांना अहिंसात्मक व नैतिक आधारावर सत्यागृह करण्यात यावा अशी आजची गांधी सत्यागृही प्रस्तुतता ही भांडवली अर्थराजकीय चौकटीत आवश्यक आहे. उदा : नर्मदा बचाव आंदोलन- मेधा पाटकर, अण्णा हजारेंचे जनलोकपालाचे आंदोलन, नेल्सन मंडेलांचे रंगभेदाचे आंदोलन, नरेंद्र दाभोळकरांचे आंदोलन, अलिकडचे मुस्लीम आणि मराठा समाजाचे आरक्षणाचे आंदोलन हे याच चौकटीत चालु आहेत.

**शांततावाद - अहिंसा :-**

सर्वच धर्मांनी अहिंसा एक महत्वाचे मुल्य मानले आहे. परंतू महात्मा गांधींनी या मुल्याला सामाजिक व राजकीय परिमाण दिले. व्यक्तिगत जीवनाप्रमाणेच सामाजिक व राजकीय जीवनात सत्यशोधनाचा, सत्य प्रस्थापित करण्याचा एकमेव मार्ग म्हणून त्यांनी अहिंसेचा पुरस्कार केला. गांधींनी कोणत्याही व्यक्तीस शारिरीक किंवा मानसिक इजा न पोहोचवणे म्हणजे नकारात्मक अहिंसा तर प्रतिपक्षावर विरोधकावर किंवा शत्रुवर प्रेम करणे म्हणजे भावात्मक अहिंसा असे दोन प्रकार सांगितले. त्यांची अहिंसेची व्यापक संकल्पना होती. दुसऱ्याचे वाईट चिंतने, शत्रुत्वाची भावना बाळगणे, यामुळे अहिंसेच्या तत्वाला बाधा निर्माण होते. असे त्यांचे म्हणणे होते. अहिंसक होण्यासाठी आत्मशक्ती, सत्तेची आकांक्षा नको, अहंकार व अद्वेत्यही नको, विनम्रता आणि धारिष्ट्याची आवश्यकता असते.

गांधी अहिंसक मार्गाचा वापर अन्याय शासनाविरुध्द देशांतर्गत दंग्याधोप्याच्या व दंगलीच्या प्रसंगी, परकिय आक्रमणाविरुध्द आणि स्वतःच्या कुटूंबात, संस्थेत वा संघटनेत करणे शक्य आहे. असे सांगतात ते त्यांनी प्रत्यक्षात वापरात आणुन दाखविले. गांधीचा हिंसेला नकार, युध्दाला नकार देवून अहिंसात्मक मार्गाने जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचे सांगतात. गांधीच्या विचारांच्या आधारावर 1960, 1970 च्या काळात जागतिक राजकारणात विशेषतः युरोपात आणि इतरत्र देशात अहिंसात्मक मार्गाची शांततामय चळवळ सुरु झालेली दिसते. आंतरराष्ट्रीय स्तरावर, शस्त्र-अस्त्र स्पर्धा वाढून हिंसात्मकता वाढलेली दिसते. तसेच देशांतर्गत स्तरावर सुध्दा विशेषतः विकसनशील देशात नागरी समाजात, जाती, धर्माच्या आधारावरील राजकारणातील दंगली, वंशवादाच्या दंगली, वरचेवर वाढतांना दिसतात. तसेच प्रदेशवाद, फुटिरतावाद, दहशतवाद या प्रकारच्या हिंसात्मक प्रवृत्ती वाढल्याने जिवित हानीत वाढ झालेली दिसते. महानगरांमध्ये अर्थराजकारणामुळे खुन, हिंसापात होतांना दिसतात. अशा हिंसात्मक धामधुमीत मानवाला शांततामय सुखी जीवन जगता येणार नाही. गांधीच्या विचारानुसार आजच्या परिस्थितीत हिंसापात रोखायचा असल्यास शांततामय मार्ग, चर्चा, मन परिवर्तन, प्रबोधन करुन देशांतर्गत नागरी समाजातील दोष दुर करता येतो. त्यासाठी तशा चळवळी, सरकारची इच्छाशक्ती आवश्यक असते. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंसापात, युध्द रोखायची असल्यास पंचशील तत्वे याचा वापर करून तसेच नाम (अलिप्ततावादी चळवळ) चा वापर करुन रोखता येते.

**विकेंद्रीकरण, राजकिय-आर्थिक सत्तेचे :-** गांधीच्या आदर्श राज्यांचा मुळ आधार खेडे राहतील, प्रत्येक खेडे स्वावलंबी, स्वयंपूर्ण व स्वायत्त असेल या खेड्यात राजकीय-आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण राहिले. उत्पादन केंद्रीत, सत्ताकेंद्रीत, राजकीय व्यवस्थेऐवजी मानव केंद्रीत सत्तेसाठी-राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. गांधी विचारावर आधारीत संविधान अनुच्छेद 40 मध्ये राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी पंचायत राज व्यवस्थेची तरतूद केलेली असुन 2 ऑक्टोबर 1959 मध्ये भारतात पंचायत राज व्यवस्थेची स्थापना करण्यात आली. पण पंचायतराजला स्थानिक स्तरावर निर्णय घेण्याचा

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded



अधिकार मात्र दिलेला नाही. म्हणूनच अण्णा हजारे यांनी ग्रामसभा हिच संसद करण्यासाठी आंदोलन करत आहेत. सरकारने गांधी विचारावर आधारित ग्राम स्वराज्यासाठी अनेक कायदे केलेले आहेत.

गांधी राजकिय सत्तेच्या विकेंद्रीकरणाबरोबरच उपयुक्ततावादी आधुनिक अर्थशास्त्राला नकार देवून भांडवलशाहीच्या केंद्रीत व्यवस्थेला विरोध करतात. गांधीच्या समाजव्यवस्थेत प्रमुख स्थान शेतीला व शेतीशी पुरक ठरणाऱ्या लघु उद्योग, ग्रामोद्योगांला आहे. गांधींच्या मते शेती ही सहकारी पध्दतीने व लहान प्रमाणात करुन शेतीस पुरक ठरणाऱ्या ग्रामोद्योगासारख्या हस्त व्यवसायांना प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळ खेडी आपल्या आवश्यक गरजा पूर्ती करतील. खेड्यातील लोकांना नौकरीसाठी इतरत्र जावे लागणार नाही व बेकारी नष्ट होईल. आज शहरी भोगविलासी जीवनांचा लोकांना कंटाळा आलेला आहे. शहरी जीवनाचे अनेक समस्यांना जन्म दिलेला आहे. अशा समस्यांपासून सुखी समृध्दीचे जीवन हे खरे खेड्यातच आहे म्हणून आता परत खेड्याकडे चला असे म्हणावे लागले.

**पर्यावरणवाद :-**

गांधीजींच्या मते औद्योगिकरणांमुळे, शहरीकरणामुळे पर्यावरण धोक्यात आले आहे. त्यांचा परिणाम निसर्ग आणि मानवी आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर झालेला आहे आणि त्यातून अनेक प्रकारांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या औद्योगिकीकरणामुळे, शहरीकरणामुळे अनेक प्रकारचे रोग, सार्वजनिक सुरक्षिततेचा, स्वच्छतेचा प्रश्न, निसर्गातील वृक्षांच्या तोडीमूळे जमिनीची धूप, पावसाचे असमान वाटप झालेले दिसते त्यातून काही ठिकाणी कोरडा दुष्काळ पडतो. प्राणहानी व वित्तहानी होते. असा परिणाम औद्योगिकीकरणांमुळे पर्यावरणावर होतो. त्यासाठी गांधी म्हणतात पर्यावरणाला पुरक संवर्धन करणारी ग्रामीण अर्थव्यवस्था स्वीकारावी. शेतीवर आधारित छोटे-छोटे लघु उद्योग गावपातळीवर निर्माण करावेत, त्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या योजना राबवाव्यात जेणेकरुन ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित होईल. त्यामुळे अनेक प्रश्न सुटतील आर्थिक केंद्रीकरण होणार नाही, शोषण होणार नाही. पर्यावरणाला पुरक जीवन जगता येईल, पर्यावरणाला पुरक अशी छोटी-छोटी धरणे बांधावेत. त्यामुळे शेतीचा विकासही होईल पर्यावरणाचे संरक्षणही होईल. गांधींच्या या पर्यायी धोरणांमुळे पर्यावरण संरक्षण आणि शहरीकरणाचे दोष कमी होतील.

**हिन्दू - मुस्लीम ऐक्य :-** भारतात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात हिन्दू-मुस्लीम जमातवादी राजकारणाची प्रवृत्ती परस्परविरोधी वाढीस लागलेली दिसते. त्याचा विपरीत परिणाम भारताच्या राष्ट्र बांधणीवर झालेला दिसतो. परस्पर विरोधी जमातवादी राजकारण वाढीस लागण्याचे कारण दोन्ही धर्मात असलेली धर्मांधता आणि मुलतत्ववादी प्रवृत्ती होय. गांधींनी जमातवादी राजकारण नष्ट करण्यासाठी सर्वधर्म समभावाच्या विचारांची मांडणी केली. गांधीच्या या विचाराची आज निकड आहे. गांधींच्या मते दोन्ही धर्मातील जमातवादी प्रवृत्ती कमी करण्यासाठी सांस्कृतिक आदान-प्रदान करणे आणि एकमेकांची मने जिंकणे आवश्यक आहे. तरच ही प्रवृत्ती कमी होत जाईल. दुसरे म्हणजे गांधी आपल्या सर्वधर्म समभावात धर्मांतर्गत टिकेला वाव देतात. त्यांच्या मते दोन्ही धर्मातील अंतर्गत अन्याय, जुलमी, रुढी, परंपराविरुध्द असून ते वाईट गोष्टींसाठी दोन्ही धर्मावर टिका करुन दोन्ही धर्मात ऐक्य निर्माण करतात. आज या विचारानूसार दोन्ही धर्मातील कट्टरतावादी तत्वे, मुलतत्ववादी तत्वे नष्ट करावेत.

गांधी विचारांनूसार भारतीय पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्री, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अधिकाराहिन आहे. या तिच्या परावलंबामुळे ती सामाजिक व राजकीय जीवन जगण्यास असमर्थ ठरली आहे. आज स्त्रीयांना विविध शैक्षणिक, प्रशासकीय, राजकीय सुविधा (राखीव जागा) दिल्या असल्या तरी ती स्वायत्तपणे, स्वतःच राजकिय हक्क भोगू शकत नाही. गांधी स्त्रीयांना स्वयंपूर्ण व ताकतवर बनविण्यासाठी तिला आर्थिकदृष्ट्या सबल बनविण्यासाठी तिला मालमत्ता हक्कात हिस्सेदार बनवावे, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांबरोबरची स्थाने द्यावे असे सुचवितात. ती आर्थिक सबल झाली की राजकिय दृष्टयाही सबल होईल.

**संदर्भ सूची :-**


1) राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर, राज्यशास्त्र कोष.
2) स.मा.गर्गे, समाजविज्ञान कोष.
3) Mahatma Gandhi and Gandhism, World focus-Ausust-2011.
4) Prof. Ashok Bhattacharya, August-2011, Gandhis Concept of Religion and Contemporary Scenario, World Focus, Page No. 463 to 468.
5) Dr. Sailaja Gallapalli, August-2011, Experiments with Gandhism : Contemporary perspectives, world focus, Page.No. 490, 91, 92.
6) Dr.Arunoday Bajpai, August-2011, Global Challenges, Global Gandhi and Global India, World Focus, Page No. 500,501,502,503.


□□□

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded